# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 266/2023 दिनांक : 09.07.2023**

## 1)जबरी चोरी :–

**2)विमानतळः**–दिनांक 07.07.2023 रोजी चे 22.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोर सुंदरनगर नांदेड येथे,** यातील फिर्यादी ही नाईट डियुटी कामी जाण्यासाठी घरामोर थांबली असता दोन अनोळखी इसम वय अंदाजे 20 ते 22 वर्ष हे अचानक हनुमानगड कडुन पल्सर गाडीवर येवुन त्यातील एक इसम गाडीवरून उतरून फिर्यादीचे डोक्यात बुकीने मारहाण करून गळयातील मंगळसुत्र हिसकावले असता ते फिर्यादीचे हातातच राहिले व फिर्यादी जवळील पर्स त्यामध्ये 20,000 रूपये नगदी व 3 ग्रॅमचे सोन्याचे पान किंमती 12,000 रूपयाचा असलेला पर्स हिसकावुन गाडीवर बसुन पळुन गेले असा एकुण किंमती 32,000/–रूपयाचा सोन्याचे दागिने व नगदी रूपये जबरीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी सविता राजेश्वरप्रसाद दगलेला, वय 39 वर्षे, व्यवसाय डॉक्टर रा. सुंदरनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 232/2023 कलम 394, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउनि/जाधव, मो.क्रं. 8007580148** हे करीत आहेत.

**2)किनवट :**–दिनांक 02.07.2023 रोजी चे 08.40 वा. चे सुमारास, **रेल्वे ब्रिज समोर सिरमेठी रोडवर किनवट ता.किनवट जि. नांदेड येथे,** यातील चार अनोळखी इसमानी यातील फिर्यादीच्या खिशातली 2000/रूपये व एक मोबाईल रियलमी सि 30 कंपनीचा किंमती 4200 चा असा एकुण 6200/–रूपयाचा ऐवज जबरीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी दिपक संजय सुरोशे, वय 24 वर्षे, व्यवसाय खाजगी नोकरी रा. घोटी ता.किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 177/2023 कलम 392, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1062 वाडगुरे, मो.क्रं. 9309737394** हे करीत आहेत.

## 2)विवाहीतेचा छळ :–

**भाग्यनगर :– दिनांक 23.05.2011 रोजी चे 18.00 वा ते दिनांक 25.06.2023** रोजी 12.00 वा.चे दरम्यान, **कुदळा बाबानगर ता.उमरी जि नांदेड व ओंकारेश्वरनगर प्रेमनगर पाटीजवळ जैनमंदीर मालेगाव रोड नांदेड येथे,** यातील आरोपी क्रंमाक एक यांनी फिर्यादीची सहमती न घेता दुसरे लग्न करून आरोपी क्रंमाक 2 व ते 3 यांनी संगणमत करून फिर्यादीस तुला मुल बाळ होत नाही तु तुझ्या माहेरून गायी घेण्यासाठी 1,00,000/– रूपये घेवुन ये म्हणुन उपशी पोटी ठेवून फिर्यादीस शिवीगाळ करून शारीरिक व मानसिक छळकरून मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली वगैरे **फिर्यादी** 42 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 259/2023 कलम 498(अ),494,323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2014 सिरसाट, मो.क्रं. 7020510553** हे करीत आहेत.

## 3)अपघात :–

**हदगाव :–** दिनांक 07.07.2023 रोजी चे 20.00 वा. चे सुमारास, **भदंत टेकडी जवळ रोडवर हदगाव ता.हदगाव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे रामराव माधवराव सुर्यवंशी, वय 35 वर्षे,** व त्यांची पत्नी उषाबाई असे त्यांचे गाव हरड येथुन मोटारसायकल हिरो स्प्लेंडर क्रंमाक एम एच 26–एजे–5412 वरून हदगाव कडे येत असताना भदंत टेकडी समोरील रोडवर मध्यभागी यातील आरोपीने आपले ताब्यातील टिपर क्रंमाक एमएच 11–एम–4730 त्यामध्ये पोकल्यांड असलेल्या रोडवर उभा करून पाठीमागील रेडियम व पार्किंग लाईट चालु नसल्याने व पोकल्यांडचे लोडर बाहेर निघालेल्या व फालक्यास धडक लागल्याने यातील टिपर चालकाने आपले ताब्यातील वहान निष्काळजीपणाने उभा करून मयताचे मरणास कारणीभूत झाला. वगैरे **फिर्यादी साईनाथ रामराव सुर्यवंशी, वय 38 वर्षे, व्यवसाय शेती रा. हरडफ ता.हदगाव नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं.147/2023 कलम 304(अ), भादवी व 177,119 मो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गायकवाड, मो.क्र.8308161089** हे करीत आहेत.

## 4)प्राणी संरक्षण अधिनीयम :–

**हिमायतनगर :– 08.07.2023 वा चे 18.30 सुमारास, जवळगाव कमानी जवळ मौजे जवळगाव ता.हिमायतनगर जि. नांदेड** यातील आरोपीने विनापरवाना बेकायदेशीर रित्या आपले ताब्यातील वहान क्रंमाक एम एच 28– बिबि–0332 मध्ये जनावरास निर्दयपणे व क्रूरपणे वागणुक देऊन वाहनात थांबून घेऊन कापण्याचे उदेशाने नेत असतांना मिळुन आले.वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/658 रमेश तुकाराम केंद्रे वय 51 वर्षे व्यवसाय नोकरी नेमणुक पो.स्टे.हिमायतनगर जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 148/2023 कलम 3,11 (1) डि,11(1)सि,11(1)एफ प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायदा व सह कलम 5(ए)5(बि) प्राणी संरक्षण अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2303 सिंगनवाड, मो.क्रं. 8378981645** हे करीत आहेत

## 5)प्रोव्हिबीशन :–

**1) मुदखेड :–** दिनांक 08.07.2023 रोजी 13.45 वा. चे सुमारास, **चिकाळा ते चिकाळा तांडा जाणारे रोडवर चिकाळा शिवारात ता.मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंरी संत्रा किंमती 3660/– व मोसा किंमती 15,000 असा एकुण 18360/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2721 गंगाधर सखाराम शिंदे,. ने. पोस्टे मुदखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 138/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** पोहेकॉ/**2232 पवार, मो.नं. 7776088897** हे करीत आहेत.

**2) वजीराबाद :–** दिनांक 08.07.2023 रोजी 17.00 वा. चे सुमारास, **लंगरसाहेब गुरूव्दारा समोरील मिलन खालसा हॉटेल मध्ये नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या डोडा मिश्रीत पाणी किंमती 10,000/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/1138 बालाजी दत्तात्रय तेलंग,. ने. स्थगुशा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 266/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1218 मठपती, मो.नं. 9420914042** हे करीत आहेत.

## 6)भारतीय हत्यार कायदा :–

**विमानतळ :–**दिनांक 07.07.2023 रोजी 20.45 वा. चे सुमारास, **आरसिसि क्लासेस समोर रोडवर नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक लोखंडी खंजर किंमती 500/–रूपयाचे बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/ पोना/591 माधव चांदोजी नागरगोजे, ने. पोस्टे विमानतळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 230/2022 कलम 4/25, भारतीय हत्यार कायदा सह कलम 34 भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/591 नागरगोजे, मो.क्र. 8412879395** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

दिनांक :- 9/07/2023

## प्रेस नोट

## खुनाच्या गुन्हयातील फरार असलेल्या आरोपीस स्थानिक गून्हे शाखेकडून अटक

पोलीस स्टेशन मुखेड येथे दाखल असलेल्या खुनाच्या गुन्हयातील आरोपी अटक करणे बाबत श्रीकृष्ण कोकाटे पोलीस अधीक्षक , नांदेड यांनी पोलीस निरीक्षक स्थागुशा नांदेड यांना सुचना देवुन सदर आरोपीतांचा शोध घेण्याबाबत आदेशित केल्यावरुन पोलीस निरीक्षक स्थागुशा यानी सदर आरोपीतांना अटक करण्यासाठी एक पथक नेमण्यात आले होते.

पोलीस ठाणे मुखेड येथे दिनांक 22/06/2023 रोजी फिर्यादी नामे श्यामराव भोसले रा. मंग्याळ तांडा यानी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली होती की, त्याचा भाऊ नामे कृष्णा भोसले यास आरोपीतानी घरातुन उचलुन नेवुन त्यास मारहाण केल्याने त्याचा मृत्यु झाला वगेरे फिर्यादी वरुन पोलीस स्टेशन मुखेड येथे गुरन 193/2023 कलम 302,364,342,324,234,143,147,148,149,506 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल असुन दिनांक 08/07/2023 रोजी श्री व्दारकादास चिखलीकर पोलीस निरीक्षक स्थागूशा नांदेड यांना गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहीती मिळाली की,सदर गुन्हयातील एक आरोपी नामे पिंटु रामा भोसले हा शिवाजी चौक लोहा येथे असल्याची माहीती मिळाल्यावरुन त्यानी एक पथक लोहा येथे रवाना केले सदर पथकाने लोहा येथे जावुन सदर आरोपीस ताब्यात घेवुन त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव पिंटु ऊर्फ छत्रपती रामा भोसले रा. लोहा जि. नांदेड असे असल्याचे सांगीतले त्यास अधिक विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली असुन त्यास पुढील तपास कामी पोलीस स्टेशन मुखेड यांचे ताब्यात दिले आहे.

सदरची कामगिरी मा. श्री श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधीक्षक, नांदेड, मा. श्री अबिनाश कुमार अपर पोलीस अधीक्षक, नांदेड, मा. श्री खंडेराव धरणे, अपर पोलीस अधीक्षक, भोकर यांच्या मार्गदर्शनाखाली, **श्री व्दारकादास चिखलीकर**, **पो. नि. स्थागूशा नांदेड,पो.उपनि. सचिन सोनवने, पोहेकॉ/1926 गुंडेराव करले, पोहेकॉ/1210 अफजल पठाण, पोकॉ/2675 देवा चव्हाण, पोहेकॉ/1242 राजु सिटीकर, पोहेकॉ/1296 दिपक ओढणे**, **पोना/2157 संजीव जिंकलवाड, पोना/2432 विठल शेळके, चालक पोहेकॉ/2719 शंकर केंद्रे** यांनी पार पाडली आहे. सदर पथकाचे मा. पोलीस अधीक्षक नांदेड यांनी कौतुक केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
**पो. अ. कार्यालय नांदेड**